नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १६३ Issue - 163 | वार मंगळवार दि. २९ ऑक्टोबर २०२४ Blow- Tuesday Date 29 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## थोडक्यात

### कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरमय्यांवर गुन्हा दाखल

बेंगळुरू: म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ऑथोरिटी अर्थात 'मुडा'मधील आर्थिक गैरव्यवहाराच्या चौकशीसाठी ईडीने सोमवारी आणखी काही ठिकाणी छापे मारले. ईडीने याच प्रकरणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरमय्या, त्यांचे कुटुंबीय आणि इतरांवर गुन्हा दाखल केला आहे. बेंगळुरू आणि म्हैसूरमधील सुमारे सात ते आठ ठिकाणी छापेसत्र सुरू आहे. त्यात बेंगळुरूमधील एक बांधकाम व्यावसायिक आणि त्याच्याशी संबंधित अन्य व्यक्तींचा समावेश आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली. 'मुडा'तील गैरव्यवहाराप्रकरणी ईडीने १८ ऑक्टोबर रोजी पहिल्या टप्प्यात म्हैसूरस्थित 'मुडा'चे कार्यालय आणि अन्य ठिकाणी छापे मारले होते. तसेच, गेल्या आठवड्यातच 'मुडा'च्या बेंगळरूतील विभागीय कार्यालयातील कनिष्ठ कर्मचाऱ्यांची चौकशीही करण्यात आली होती. लोकायुक्तांनी दाखल केलेल्या गुन्ह्यांची दखल घेऊन ईडीने कर्नाटकचे मुख्यमंत्री आणि इतरांवर गुन्हा दाखल करण्यासाठी आर्थिक गैरव्यवहारविरोधी कायदा (पीएमएलए) अंतर्गत माहिती अहवाल (ईसीआयआर) सादर केला आहे. मुडाद्वारे पत्नीला १४ भूखंडाचे वाटप करण्यात आलेल्या कथित अनियमिततेप्रकरणी सिद्धरामय्या यांची लोकायुक्त आणि ईडीकडून चौकशी सुरू आहे. लोकायुक्तांनी नुकतीच सिद्धरामय्या यांची पत्नी बी. एम. पार्वती यांचीही चौकशी केली होती. म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट ऑथोरिटीमध्ये घोटाळा झाल्याची तक्रार करणाऱ्यांपैकी एक तक्रारदार स्नेहमयी कृष्णा यांनी सोमवारी त्यांच्या तक्रारीच्या समर्थनार्थ व्हिडीओ पुरावा ईडीला सादर केला. कृष्णा हे नुकतेच ईडीसमोर चौकशीला हजर राहिले होते, तसेच त्यांनी काही कागदपत्रेही सादर केली होती.

# राज्यात परतीच्या पावसाचा फटका

## १५ जिल्ह्यातील १९ लाख हेक्टरवरील पिके, फळबागांचे नुकसान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात गेल्या काही दिवसांत झालेल्या परतीच्या पावसाचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. अवकाळी पावसामुळे १५ जिल्ह्यांतील १९ लाख हेक्टरवरील पिके आणि फळबागांचे नुकसान झाले आहे. मदत आणि पुनर्वसन विभागाने शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत प्रस्ताव निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी पाठविल्याचे समजते.

अरबी समुद्रात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे गेल्या दोन आठवड्यांत राज्याच्या विविध भागांत जोरदार पाऊस झाला. त्यातच परतीच्या पावसाचाही मोठा फटका शेतीला बसला. गेल्या काही दिवसांत झालेल्या जोरदार पावसामुळे ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नंदुरबार, अहिल्यानगर, पुणे, सांगली, जालना, बुलढाणा, भंडारा, वर्धा, गोंदिया आणि चंद्रपूर या जिल्हयांना अधिक फटका बसला आहे. भात, मका, सोयाबीन, कांदा, कापूस, तूर, ज्वारी, मुग, उडीद, लिंबू, भाजीपाला तसेच फळबागांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

**मदतीसाठी निवडणूक आयोगाकडे प्रस्ताव**

मदत व पुनर्वसन विभागाने बाधित शेतकऱ्यांना अर्थसाहाय्य करण्यासाठी २३०० कोटींच्या मदतीचा प्रस्ताव तयार केला आहे. मात्र राज्यात निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने निवडणूक आयोगाच्या मान्यतेशिवाय सरकारला कोणतीही घोषणा करता येत नाही.

परिणामी सरकारने याबाबतचा प्रस्ताव निवडणूक आयोगाकडे पाठविला असून आयोगाच्या मान्यतेनंतर मदत दिली जाणार असल्याची माहिती मंत्रालयातील सूत्रांनी दिली.

# रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी महायुतीला विजयी करण्यासाठी प्रचाराला लागावे : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे निर्देश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई /प्रतिनिधी : रिपब्लिकन पक्ष हा शिवसेना भाजप राष्ट्रवादी महायुतीचा घटक पक्ष आहे.रिपब्लिकन पक्षाला महायुतीतून मुंबईत धारावी आणि कालिना हे दोन मतदार संघ देण्यात आले आहेत तसेच महायुती ची सत्ता आल्यानंतर एक विधानपरिषद सदस्यत्व आणि राज्यात एक कॅबिनेट मंत्री पद तसेच ४ महामंडळ अध्यक्ष पदे आणि महामंडळ संचालक पदे जिल्हा तालुका शासकीय कमिटी सदस्य पदे तसेच महापालिका जिल्हा परिषदा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये रिपब्लिकन पक्षाला जागा देण्याचे महायुती द्वारे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस आश्वासन दीले आहे.त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासासाठी; दलितांच्या विकासासाठी रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी नाराजी बाजूला सारून नव्या दमाने भाजप शिवसेना रिपाइं राष्ट्रवादी महायुती ला विजयी करण्यासाठी प्रचाराला लागावे असे आवाहन आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी केले.



मुंबईत बांद्रा येथील ना.रामदास आठवले यांच्या जनसंपर्क कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर; राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे; मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे; सुरेश बार्शिंग; पोपटशेठ घनवट,दयाळ बहादुर ; विवेक पवार; साधू कटके, घनश्याम चिरनकर आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

### कलिना मधून रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी अमरजीत सिंह यांना जाहीर; धारावी ची उमेदवाराचे उद्या नाव जाहीर करणार

रिपब्लिकन पक्षाला शिवसेना च्या कोट्यातून धारावी मतदारसंघ आणि भाजप च्या कोट्यातून कालिना हे मुंबईतील दोन मतदार संघ रिपब्लिकन पक्षाला सोडण्यात आले आहेत.त्या बाबतची अधिकृत घोषणा आज पत्रकार परिषदेत ना.रमदास आठवले यांनी केली.महायुतीचे सरकार पुन्हा सत्तेत आल्यानंतर रिपब्लिकन पक्षाला सत्तेत वाटा देण्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठोस आश्वासन दिले आहे त्यामूळे रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी नाराजी दूर सारून महायुतीच्या उमेदवारांचा प्रचार करावा असे आवाहन ना. रामदास आठवले यांनी केले आहे.

कलिना मतदारसंघातून अमाजित सिंह यांना रिपब्लिकन पक्षाची उमेदवारी जाहीर करण्यात आली असून उद्या धारावी मधून रिपब्लिकन पक्षाचे मुंबई अध्यक्ष सिद्धार्थ कासारे किंवा समीर वानखेडे यांच्या पैकी कोणाला उमेदवारी द्यायची याचा निर्णय घेण्यात येईल असे ना.रामदास आठवले यांनी आज सांगितले.

# जम्मूत एक दहशतवादी ठार, लष्कराच्या ताफ्यावर गोळीबार; सुरक्षा दलाचे जोरदार प्रत्युत्तर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

जम्मू : जम्मू येथे विशेष कमांडोंच्या दहशतवादविरोधी मोहिमेत सोमवारी एका दहशतवाद्याचा खात्मा करण्यात आला. दहशतवाद्यांनी सोमवारी सकाळी लष्कराच्या ताफ्यावर अखनूर विभागात गोळीबार केला. सुदैवाने, यात कुठलीही जीवितहानी झाली नाही. तीन दहशतवादी भारतात घुसल्याचा संशय असून, विशेष कमांडोंची दहशतवाद्यांविरोधात मोहीम रात्री उशिरापर्यंत सुरू होती. लष्कराच्या जम्मू येथील 'व्हाइट नाइट कोअर'ने एका दहशतवाद्याला मारल्याची माहिती दिली. या दहशतवाद्याकडून शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. लष्कराच्या ताफ्यावर सोमवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास दहशतवाद्यांनी गोळीबार केला. यात सर्वाधिक गोळ्या लष्कराच्या रुग्णवाहिकेला लागल्या. लष्कराकडून जोरदार प्रत्युत्तर दिले जाण्याच्या शक्यतेवरून दहशतवादी जवळच्या जंगलात पळून गेले. दहशतवादी कुठे लपले आहेत, हे नंतर शोधण्यात आले. लष्कराचे विशेष कमांडो आणि राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या (एनएसजी) कमांडोंनी दहशतवादविरोधी कारवाई केली. दुपारी पावणेतीनपर्यंत गोळीबार आणि स्फोटांचा मोठा आवाज येत होता. हेलिकॉप्टरही टेहळणीसाठी वापरण्यात आले. सोमवारी सकाळी आसन सुंदरबनी क्षेत्राजवळ दहशतवाद्यांनी लष्कराच्या ताफ्यावर गोळीबार केला. या भागात एपीसी 'सारथ' म्हणून ओळखली जाणारी 'बीएमपी-२' लढाऊ वाहने तैनात केली आहेत.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीची चौथी यादी ; सात उमेदवारांचा समावेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेची निवडणूक जाहीर झाल्यानंतर अनेक राजकीय घडामोडी घडत आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी, महायुती, तसेच इतर पक्षांकडूनही उमेदवारांच्या याद्या जाहीर करण्यात येत आहेत. आता आज (२८ ऑक्टोबर) राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची चौथी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत ७ जणांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाकडून एक्स या मायक्रोब्लॉगिंग प्लॅटफॉर्मवर यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये माण मतदारसंघासाठी प्रभाकर घार्गे, काटोल-सलील अनिल देशमुख, खानापूर-वैभव पाटील, वाई-



अरुणादेवी पिसाळ, दौंड-रमेश थोरात, पुसद- शरद मेंद, सिंदखेडा-संदीप बेडसे यांच्या नावाचा समावेश आहे. दरम्यान, शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून याआधी तीन याद्या जाहीर करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे चिरंजीव सलील देशमुख यांना काटोल विधानसभा मतदारसंघामधून उमेदवारी देण्यात आली आहे. दरम्यान, अनिल देशमुख यांनी विधानसभा निवडणुकीच्या मैदानातून माघार घेतली आहे. त्यांच्या ऐवजी त्यांचा मुलगा सलील देशमुख हे आता निवडणुकीच्या मैदानात असणार आहेत. अनिल देशमुख यांनी माघार घेतल्यामुळे आता पक्षाकडून त्यांच्या मुलाला उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

माण प्रभाकर घार्गे, काटोल सलील अनिल देशमुख, खानापूर वैभव पाटील, वाई अरुणादेवी पिसाळ, दौंड रमेश थोरात, पुसद शरद मेंद, सिंदखेडा संदीप बेडसे

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून २४ ऑक्टोबर रोजी ४५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर २६ ऑक्टोबर रोजी २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा २७ ऑक्टोबर रोजी ९ उमेदवारांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली होती. यानंतर आता आज ७ उमेदवारांची यादी चौथी यादी जाहीर करण्यात आली आहे. दरम्यान, विधानसभेच्या निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान पार पडणार आहे, या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आता उद्या २९ ऑक्टोबर रोजी शेवटचा दिवस आहे. त्यामुळे अनेक नेत्यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. तसेच राहिलेल्या उमेदवारांच्या याद्याही आता जाहीर करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर आज शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून सात उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

# शिवसेना शिंदे गटाची तिसरी यादी, १५ उमेदवारांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शिवसेनेने (एकनाथ शिंदे) महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठीच्या १५ उमेदवारांची नवी यादी जाहीर केली आहे. ही शिंदेंच्या शिवसेनेची तिसरी यादी आहे. या यादीद्वारे शिवसेनेने भाजपाच्या शायना एन. सी. यांना मुंबईतील मुंबादेवी मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. शायना एनसी या वरळी विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी यासाठी प्रयत्न करत होत्या. मात्र, त्यांना वरळीतून उमेदवारी मिळू शकली नाही. मात्र, आता त्यांना



शिवसेनेने (शिंदे) मुंबादेवीमधून उमेदवारी दिली आहे. शायना एनसी या लवकरच शिंदेंच्या शिवसेनेत जाहीर प्रवेश करतील. दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सिंदखेडराजा मतदारसंघातून शशिकांत खेडेकर यांना, तर कन्नड मतदारसंघातून संजना जाधव यांना विधानसभेच्या रिंगणात उतरवलं आहे. कल्याण ग्रामीणमधून राजेश मोरे यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

शशिकांत खेडेकर- सिंदखेडराजा, घनसावंगी- हिकम उढाण, कन्नड- संजना जाधव, कल्याण- ग्रामीण राजेश मोरे, भांडूप (पश्चिम)- अशोक मोरे, मुंबादेवी शायना एनसी, संगमनेर-अमोल खताळ, श्रीरामपूर- भाऊसाहेब कांबळे, नेवासा- विठ्ठलराव लंघे-पाटील, धाराशिव- अजित पिंगळे, करमाळा- दिग्विजय बागल, बार्शी- विठ्ठल राऊत, गुहागर- राजेश बेंडल

विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न ऐरणीवर

**विद्यार्थी, पालक व महाविद्यालये अडचणीत येण्याची शक्यता**

# औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया स्थगित

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय औषधनिर्माण परिषदेच्या आदेशानुसार पदवी व पदव्युत्तर पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये काही महाविद्यालयांचा समावेश न होताच प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली. त्यामुळे या महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेवर आक्षेप घेतला. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने त्याची दखल घेत औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया अचानक स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. औषधनिर्माणशास्त्र



अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विलंबाने सुरू झाल्यानंतर दोन फेऱ्यांनंतर ही प्रक्रिया स्थगित करण्यात आल्याने विद्यार्थी, पालक व महाविद्यालये अडचणीत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भारतीय औषधनिर्माण परिषदेने प्रवेश प्रक्रिया राबविण्याबाबत दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने शासन निर्णय जाहीर करण्याची विनंती २१ ऑक्टोबर रोजीच्या पत्रान्वये करत काही महाविद्यालयांनी प्रवेश प्रक्रियेवर आक्षेप घेतला आहे.

त्यामुळे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या दोन फेऱ्या झाल्यानंतर सद्य:स्थितीत सुरू असलेली प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात येत असल्याचे सर्व विद्यार्थी व महाविद्यालयांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून कळविण्यात आले आहे. तसेच पुढील प्रक्रियेबाबतची सूचना अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. त्याअनुषंगाने उमेदवार व संस्थांनी नियमितपणे कार्यालयीन संकेतस्थळाला भेट द्यावी, असे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी झालेल्या नोंदणी प्रक्रियेत राज्यातील ४९७ महाविद्यालयांमधील ४६ हजार ५१२ जागांसाठी ५० हजार ५५६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडून प्रवेश प्रक्रिया राबविण्यास सुरुवात केल्यानंतर आतापर्यंत दोन फेऱ्या पार पडल्या असून, या दोन फेऱ्यांमध्ये नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी २१ हजार ९६१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत, तर २४ हजार ५५१ जागा रिक्त आहेत.

यंदा विद्यापीठांची संलग्नता आणि फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाची मान्यता मिळवण्यास उशीर झाल्यामुळे महाविद्यालयांना राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाकडे नोंदणी करण्यास विलंब झाला. त्यामुळे राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने देखील प्रवेश प्रक्रिया उशिराने सुरू केली. प्रवेश प्रक्रिया उशीराने सुरू झाल्याने औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम शिकविणाऱ्या महाविद्यालयांना विद्यार्थी मिळणे अवघड झाले आहे. त्यातच दोन फेऱ्या झाल्यानंतर राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षा पुन्हा प्रवेश प्रक्रियेला स्थगिती दिल्यामुळे विद्यार्थी, पालक आणि महाविद्यालयांसमोर अडचणींचा डोंगर उभा राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## संपादकीय....

### जनगणना

दर दहा वर्षांनी देशातील जनगणना केली जात असते. मात्र. कोरोनाच्या काळात २०२१ ची जनगणना लांबणीवर पडली होती. त्यानंतर आता केंद्र सरकार २०२५ मध्ये जनगणना करणार असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, केंद्र सरकारने या संदर्भात अद्याप अधिकृत कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. मात्र, पुढील २०२५ या वर्षापासून केंद्र सरकार जनगणनेला सुरुवात करणार असल्याचं सांगितलं जात आहे. जर केंद्र सरकारने २०२५ मध्ये जनगणना करण्यास सुरुवात केली तर २०२६ पर्यंत पूर्ण होऊन त्या जनगणनेचा अंतिम अहवाल २०२६ मध्ये येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे भारताच्या लोकसंख्या आकडा या माध्यमातून समोर येणार आहे. याबरोबरच देशातील जनगणना पूर्ण झाल्यानंतर केंद्र सरकार लोकसभा जागांच्या सीमांकनाचा अभ्यासही सुरु करणार असल्याची माहिती काही वृत्तानुसार समोर आली आहे. मात्र, याबाबतही अद्याप अधिकृत कोणतीही माहिती सरकारकडून देण्यात आलेली नाही. दरम्यान, २०२१ मध्ये देशाची जनगणना झाली नव्हती, त्यामुळे आता २०२५ मध्ये जर जनगणना झाली तर चार वर्षांच्या लांबणीवर होणार आहे. त्यामुळे देशाची लोकसंध्या किती टक्यांनी वाढली हे जनगणनेचा अहवाल समोर आल्यानंतर स्पष्ट होईल. दरम्यान, काँग्रेससह विरोधी पक्षाचे नेते केंद्र सरकारकडे जातीवर आधारित जनगणनेची मागणी करत आहेत. विरोधकांच्या मते जातीवर आधारित जनगणना केल्यास सर्व जातीजमातींच्या लोकांची संख्या समोर येईल. मात्र, भारतीय जनता पक्षाचा विरोधकांच्या या मागीला विरोध दर्शविलेला आहे.देशातील जनगणनेसंदर्भात महत्वाची माहिती समोर आली आहे. केंद्र सरकार २०२५ मध्ये भारताच्या जनगणनेला सुरुवात करण्याची शक्यता आहे. २०२५ मध्ये जनगणनेला सुरुवात केल्यानंतर २०२६ पर्यंत ही जनगणना पूर्ण होण्याचा अंदाज आहे. यासंदर्भात केंद्र सरकारने नियोजन सुरू केलं असल्याची माहिती सांगितली जात आहे.

# मराठवाड्यात पाण्याची तूट भरून निघणार



इंग्रजांच्या तावडीतून भारत देश स्वतंत्र झाल्यानंतर तब्बल एक वर्षांनी मराठवाडा स्वतंत्र झाला. त्यानंतर आजपर्यंत मराठवाड्यातील पाणी प्रश्न कोणतेही सरकार सोडवू शकले नाही; परंतु राज्य मंत्रिमंडळाची शेवटची बैठक मराठवाड्यासाठी फलदायी ठरली. राज्य मंत्रिमंडळाचा हा निर्णय स्वागतार्ह आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे मराठवाड्यातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी मदत मिळेल, अशी प्रतिक्रिया या क्षेत्रातील तज्ज्ञ मंडळी देत आहेत. गोदावरी खोऱ्यातील ११५ टीएमसी तूट भरून काढण्यासाठी अरबी समुद्रात वाहून जाणाऱ्या पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी गोदावरी खोऱ्यात वळते करण्याची मागणी सातत्याने होत होती. तत्कालीन राज्यपाल, मुख्यमंत्री व जलसंपदा मंत्र्यांकडे याबाबत वारंवार पाठपुरावा केला जात होता.

११ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या राज्य जलपरिषदेत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठवाड्याची तूट भरून काढण्यासाठी निर्देश दिले होते. याबाबतच्या निर्णयावर महायुती सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी दिली आहे. दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड प्रकल्पास मान्यता देण्यात आल्याने ही मराठवाड्यासाठी आनंदाची बाब मानली जात आहे. मराठवाड्यातील १० हजार ११ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. दमणगंगा-एकदरे-गोदावरी नदीजोड योजनेस तसेच दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड योजनेस शेवटच्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. दमणगंगा - एकदरे - गोदावरी या योजनेतून मराठवाड्यातील लाखो शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. या योजनेतून १० हजार ११ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होईल. तसेच ६८ दलघमी पाणी सिंचनासाठी, १३.७६ दलघमी पाणी पिण्यासाठी आणि ९.१७ दलघमी पाणी उद्योगासाठी उपलब्ध होणार आहे. यापूर्वी दुष्काळग्रस्त मराठवाड्यासाठी कोकणातून पाणी वळविण्याच्या योजनांना मान्यता देण्यात आली आहे. आंतरराज्यीय दमण गंगा - पिंजाळ, नदीजोड प्रकल्प व नारपार गिरणा नदी योजना, पार गोदावरी, दमणगंगा- वैतरणा - गोदावरी, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या नदीजोड प्रकल्पांना राज्यांतर्गत प्रकल्प म्हणून राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या प्रकल्पांची किंमत २ हजार २१३ कोटी रुपये आहे. दमणगंगा-वैतरणा-गोदावरी नदीजोड योजनेच्या १३ हजार ४९७ कोटी किमतीच्या प्रकल्पासदेखील मान्यता देण्यात आली. हा प्रकल्प दमणगंगा आणि वैतरणा उपखोऱ्यातील ५.६८ टीएमसी अतिरिक्त पाणी स्थानिक वापरासाठी तसेच नाशिक जिल्ह्यातील अवर्षणप्रवण सिन्नर तालुका आणि मराठवाड्यातील जायकवाडी प्रकल्पाच्या लाभ क्षेत्राला याचा लाभ होईल. भारताच्या स्वातंत्र्यापासून आजपर्यंत एवढा मोठा निर्णय मराठवाड्याच्या बाबतीत घेण्यात आला नव्हता; परंतु हा निर्णय मराठवाड्याचा कायापालट करणारा ठरणार आहे.

छत्रपती संभाजीनगरमधील शनी देवगाव येथील उच्च पातळी बंधाऱ्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. हा बंधारा गोदावरी पाटबंधारे विकास महामंडळाच्या अंतर्गत गोदावरी खोऱ्यात असून, या प्रकल्पामुळे ८.८४ दलघमी पाणीसाठा निर्माण होणार आहे. त्यामुळे १,९७८ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळेल, या बंधाऱ्याच्या बुडीत क्षेत्रातील नादुरुस्त अवस्थेतील कमालपूर व खानापूर या कोल्हापुरी बंधाऱ्यांचा पाणी वापर शनी देवगाव बंधाऱ्यातून करण्यात येईल. नांदेड जिल्ह्यातील माहूर निकटच्या पैनगंगा नदीवरील उच्च पातळी बंधाऱ्याच्या मंजुरीसाठी हिंगोलीचे तत्कालीन खासदार हेमंत पाटील यांनी प्रयत्न केले होते. हा बंधारा गत वर्षीच त्यांच्या कार्यकाळात मंजूर करून घेतला होता. तीर्थक्षेत्र माहूरची पेयजल समस्या मार्गी लागण्यासाठी पैनगंगा नदीवर उच्च पातळी बंधारा निर्माण करावा अशी मागणी गत ८ ते १० वर्षांपासून प्रलंबित होती. मात्र तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशाने हिवाळी अधिवेशनात

गत आठवड्यात माहूर लगतच्या पैनगंगा उच्च पातळी बंधाऱ्या संदर्भात मुख्य सचिव दीपक कपूर यांच्या कक्षात बैठक होऊन डिसेंबर २०२३ मध्ये हा विषय मार्गी लागला होता. त्याच वेळी भूसंपादन करण्याचे आदेश सुद्धा जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले होते. मराठवाड्यातील पाणी विषयक प्रश्न मार्गी लागल्याने भविष्यात सरकार कोणाचेही येवो; परंतु येथील नागरिकांची पाण्याची सोय होणार आहे हे निश्चित.

४५ वर्षांनंतर दुरुस्ती पैठण येथील जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्याच्या दुरुस्तीसाठी राज्य सरकारकडून ७०० कोटी रुपये मिळणार आहेत. ४५ वर्षांनंतर दुरुस्तीची मागणी मान्य केली आहे. शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या या मागणीसाठी ४५ वर्षांचा कालावधी लागतो, यावरून मराठवाड्याच्या विकासाचा अंदाज लावता येतो. राज्य सरकारने राज्यातील विविध धरणे आणि कालव्यांच्या दुरुस्तीसाठी महाराष्ट्र इरिगेशन इम्प्रुमेंट प्रोग्राम ही पंचवार्षिक योजना आणली आहे. यात जायकवाडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यासाठी दुसऱ्या टप्प्यात ७०० कोटी रुपयांचा निधी देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. छत्रपती संभाजीनगर, जालना आणि परभणी असा सुमारे २०८ किलोमीटर लांबीचा हा कालवा आहे. या तिन्ही जिल्ह्यांतील सुमारे १लाख ४४ हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आणली आहे. या कालव्याची मागील ४५ वर्षांत दुरुस्ती झाली नाही. परिणामी कालव्यात आणि कालव्यावर ठिकठिकाणी झाडी, झुडपे उगवली. एवढेच नव्हे, तर कालव्याचा सरफेस उखडला आहे. परिणामी कालव्याची पाणी वहन क्षमता ५० टक्के कमी झाली आहे. जायकवाडीतून सिंचनासाठी २० दिवसांच्या एका आवर्तनास आता सुमारे ४० दिवसांचा कालावधी लागतो. ही बाब लक्षात घेऊन डाव्या कालव्याची तातडीने दुरुस्ती करावी, अशी अनेक वर्षांपासून शेतकऱ्यांची मागणी आहे. या मागणीची दखल घेत दीड वर्षांपूर्वी डाव्या कालव्याचे सर्वेक्षण करण्यात आले. तेव्हा डावा कालवा आणि त्याच्या मुख्य आणि उपवितरिकांची नव्याने बांधणी करणे गरजेचे असल्याचा अहवाल सुचविण्यात आला. महाराष्ट्र इरिगेशन इम्प्रुमेंट प्रोग्राममध्ये जायकवाडी प्रकल्पासाठी दुसऱ्या टप्प्यात ७०० कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे. मराठवाड्याचा विकास करत असताना नेते मंडळी या मागणीसाठी कमी पडले, म्हणून कालवा दुरुस्तीची मागणी ४५ वर्षांनंतर मान्य झाली आहे.

# विकसित भारताच्या वाटचालीत महाराष्ट्राचा वाटा मोठा!




लोकसभा निवडणुकीनंतर पहिल्यांदाच मुंबईत आलेल्या परराष्ट्रमंत्र्यांनी पत्रकार परिषदेच्या प्रास्ताविकात आपली भूमिका स्पष्ट केली. जयशंकर यांनी सांगितले की, मोदी सरकारच्या तिसऱ्या पर्वात विकसित महाराष्ट्राच्या संकल्पपूर्तीसाठी समर्पितपणे व वेगवान काम सुरू असून त्यासाठी महाराष्ट्राचा विकास वेगवान असायलाच हवा. स्वातंत्र्यानंतर उद्योग, तंत्रज्ञान, विमानतळ, रेल्वे वाहतूक, बुद्धिमत्ता, भौगोलिक सुविधा यांमध्ये महाराष्ट्र कायम आघाडीवर राहिला आहे. मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात झालेले काम महाराष्ट्रातील डबल इंजिन सरकार सर्वसमान्यांपर्यंत पोहोचवत आहेत. गेल्या काही महिन्यांत विदेशी गुंतवणूक, उत्पादन, निर्यातवाढ, यांबाबत सरकारने मोठे निर्णय घेतले असून त्यामुळे देशातील गुंतवणूक, पायाभूत सुविधांचा विकास, बंदरांचा विकास तसेच रेल्वे, रस्ते वाहतुकीच्या सुविधा बळकट झाल्या आहेत.


जागतिक उद्योगक्षेत्राबरोबरच, जागतिक नेत्यांचाही भारताविषयीचा विश्वास वाढल्यामुळे भारताची प्रतिमा आणि प्रतिष्ठा स्पष्ट झाली असून जागतिक उद्योगविश्व भारतात गुंतवणुकीसाठी उत्सुक आहे, यापेक्षा अन्य पुराव्याची गरज नाही. जेथे राज्य, केंद्र सरकार एकत्र काम करतात, तेथे उद्योगांची साहजिकच पहिली पसंती असते. सुसज्ज सुविधांसोबतच महाराष्ट्र हे भौगोलिकदृष्ट्या गुंतवणुकीस सर्वाधिक योग्य राज्य असल्याची जागतिक उद्योगांची भावना असल्यामुळे विकसित भारत संकल्पनेच्या पूर्ततेमध्ये महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे, असे गौरवोद्गार परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी रविवारी काढले. मुंबई भाजपा कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत जयशंकर बोलत होते. मुंबई भाजपा अध्यक्ष आ. आशीष शेलार, सरचिटणीस संजय उपाध्याय यावेळी उपस्थित होते.

कौशल्य, शिक्षण, प्रशिक्षण यांच्या आधारे तरुण पिढीला रोजगारक्षम बनविण्यावर भर दिला जात असल्यामुळे आता केवळ देशातच नव्हे, तर 'ग्लोबल वर्कप्लेस' म्हणजे, अनेक अन्य देशांतही आमचे रोजगारक्षम तरुण नोकऱ्या मिळवू लागले आहेत. पंतप्रधान मोदी स्वतः काही आठवड्यांपूर्वी सिंगापूरच्या जी-७ संमेलनात सहभागी झाले होते. संयुक्त राष्ट्रसंघ, अमेरिकेसारख्या देशांच्या दौऱ्यात त्यांनी तेथील उद्योगपती, कंपन्यांसोबत चर्चा केली. आता रोजगार, गुंतवणूक, उत्पादन या क्षेत्रांत देशाने भक्कमपणे पाय रोवले असून यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची पूर्तता केली जात आहे. शेजारी राष्ट्रांतील घटनांबाबतही आपण योग्य प्रकारे सतर्क असून जगातील तणावपूर्ण परिस्थितीत पंतप्रधान मोदी यांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे, याकडेही परराष्ट्र व्यवहारमंत्र्यांनी लक्ष वेधले. गेल्या दशकभरात देशाच्या सीमाभागात मोठे परिवर्तन झाले असून सीमेवर कुंपण बांधण्यात प्रगती झाल्याने पूर्वी एवढी घुसखोरी आता होत नाही, असा दावाही त्यांनी केला. मध्यंतरीच्या बांगलादेशातील राजकीय अस्थिरतेमुळे सीमेपलीकडून काही प्रयत्न झाले, पण कारवाई करावी लागली. मोदी सरकार देशाच्या सीमा सुरक्षित राखण्यासाठी जरूर प्रयत्न करत राहील. जेथे कुंपण घालणे गरजेचे आहे, तेथे कुंपणही घातले जाईल, असे त्यांनी निःसंदिग्धपणे स्पष्ट केले. बांगलादेश, म्यानम्यारमधून काहीजण शरणार्थी बनून घुसखोरी करू पाहत असल्याचे स्पष्ट झाल्याने सीमासुरक्षेचा फेरआढावा घेतला जात असून आम्ही सीमाभाग मोकळा राहू देणार नाही. कोणीही कसेही घुसावे ही २०१४ पूर्वीची स्थिती आता राहिलेली नाही, असा निर्वाळाही त्यांनी दिला. केंद्र आणि राज्य सरकारांची औद्योगिक नीती वेगळी असते, हे खरे आहे. यामध्ये समन्वय असावा याकरिता डबल इंजिन सरकार गरजेचे असते असे ते म्हणाले. भारतात गुंतवणूक करू इच्छिणाऱ्यांसाठी वेगवेगळ्या राज्यांत १२ विभाग जाहीर करण्यात आले आहेत. त्यांचे स्थान, आकार, वैशिष्ट्ये वेगळी आहेत, त्यामुळे राज्यांनी त्याबाबतचे धोरण निश्चित करावे, अशी अपेक्षाही एस.जयशंकर यांनी व्यक्त केली. राज्य सरकारांची भागीदारी सकारात्मक असावी, त्यावरच या योजनेचे यश अवलंबून आहे, असे ते म्हणाले. गुंतवणूक आकृष्ट करण्यासाठी राज्यांनी स्पर्धा करावी, ती देशहिताचीच असते.

पण महाराष्ट्र हे सर्वाधिक उद्योगप्रधान राज्य असून उद्योगांची महाराष्ट्रास पसंती आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. महाराष्ट्रातील बंदरे ही सर्वाधिक जागतिक सुविधायुक्त आहेत. रस्ते, रेल्वेचे जाळे आहे, महाराष्ट्राला महत्त्वाची भौगोलिक अनुकूलता आहे. त्यामुळे गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र आदर्श राज्य आहे. जर्मनीतील अनेक उद्योगांनी महाराष्ट्राला पसंती दिली आहे. सरकारची इच्छाशक्ती, गुणवत्ता, प्रतिसादात्मकता यांवर अखेर अवलंबून आहे. येत्या पन्नास वर्षांत भारत संपूर्ण विकसित राष्ट्र असेल. पण ते आपोआप घडणार नाही. त्यासाठी द्रष्टेपण, धोरणे, संधींचा लाभ घेण्याचा उत्स्फूर्त आत्मविश्वास, आवश्यक असतो. तसे दिसू लागल्याने लोकांच्या अपेक्षा वाढल्या असून या अपेक्षांची पूर्तता कशी केरता येईल यावर मोदी सरकारचा भर आहे. एक दिवस असा येईल, तेव्हा या अपेक्षांची आम्ही नक्कीच पूर्तता केलेली असेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. २१ ऑक्टोबरला चीन भारत चर्चे दरम्यान काही मुद्द्यांवर सहमती झाल्याने गस्तीमध्ये येणाऱ्या अडचणी दूर झाल्या आहेत. मोठ्या संख्येने समोरासमोर असलेले सैन्य मागे घेण्यावरही सहमती झाली असून आता सीमांचे व्यवस्थापनावरही चर्चा होणार आहे. दहशतवाद समूळ नष्ट करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. दहशतवादाच्या आव्हानास आम्ही ठामपणे उत्तर देत आहोत, हे जगाने पाहिले असून भारत हा दहशतवादविरोदी लढाईचे नेतृत्व करत आहे. दहशतवादाचा चेहरा जगासमोर उघडा करून जेथे कारवाईची गरज आहे तेथे कठोर पावले टाकणारच, असे त्यांनी परखडपणे स्पष्ट केले. काश्मीरमध्ये सीमेपलीकडून दहशतवादास फूस आहे, यात शंका नाही. पण जनतेने लोकशाहीला कौल दिला आहे. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत तेथे ६० टक्के जनता मतदानात सहभागी झाली, हे लोकशाहीसाठी महत्त्वाचे आहे. कोण जिंकले हे महत्त्वाचे नाही. भारत जिंकला ही वस्तूस्थिती आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतरचे हे परिवर्तन आहे, असे ते म्हणाले. मणिपूरमधील प्रश्न गुंतागुंतीचे, जुने आहेत, हे खरे आहे. पण मणिपूरच्या नावावर भारताची प्रतिमा जगासमोर मलिन करण्याचा राजकीय अजेंडा योग्य नाही. लोकशाही कधीच परिपूर्ण नसतात. तेथे काही समस्या असतात. पण प्रत्येक काही वर्षांनी देशातील जनता पर्यायांतून सर्वाधिक चांगला पर्याय निवडत असते, लोकशाहीचे हे यश आहे, असे सूचक विधानही परराष्ट्र व्यवहारमंत्र्यांनी केले.

# अंगणवाडी सेविकेचा खून करणाऱ्या आरोपीस फाशीची शिक्षा द्या अन्यथा महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन करू : पूनमताई निंबाळकर





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : २४/१०/२०२४ रोजी मौजे चिंचोडी पाटील ता. अहिल्यानगर अंगणवाडी केंद्र मारुतीवाडी येथील अंगणवाडी सेविका उमा महेश पवार यांची निर्घुण पुणे हत्या करण्यात आलेली आहे.

सदर आरोपीस कठोरातील कठोर शिक्षा व्हावी यासाठी इंदापूर तालुक्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीस सर्वांनी आज २८/१०/२०२४रोजी पोलीस स्टेशनमध्ये निवेदन देऊन निषेध नोंदवत या वेळी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका पुणे जिल्हा अध्यक्षा पुनमताई निंबाळकर यांच्या नेतृत्वाखाली निषेध नोंदवत आला.

पुढे बोलताना पुनम निंबाळकर म्हणाल्या की निर्घुण हत्या करणाऱ्या सदर घटनेचा आम्ही जाहीर निषेध करत असून आरोपीस व त्यामागील 'सूत्रधार यांचा तपास करून आरोपीस कठोरातील कठोर शिक्षा म्हणजे फाशीची शिक्षा देण्यात यावी. आरोपीस फाशीची शिक्षा दिल्यास असे कृत्य करणाऱ्यास भीती निर्माण होईल व भावी काळात असे गुन्हे घडणार नाही त्यामुळे सदर आरोपीस फाशीची शिक्षा व्हावी अन्यथा संपूर्ण महाराष्ट्रभर तीव्र आंदोलन केले जाईल.

तसेच महाराष्ट्रातील अंगणवाडी सेविका मधील सर्व सेविका व मदतनीस, परिवेक्षिका यांचे आशा गाव गुंडांपासून संरक्षण व्हावे असा कायदा करून त्यांची कडक अंमलबजावणी करण्यात यावी असे ही पुनमताई निंबाळकर बोलताना म्हणाल्या.

# परदेशी वैद्यकीय पदवी परीक्षा नोंदणी प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : परदेशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी द्याव्या लागणाऱ्या परदेशी वैद्यकीय पदवी परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आल्यानंतर सोमवारी सकाळी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाकडून परीक्षा प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. परीक्षा देण्यासाठी इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांना २८ ऑक्टोबरपासून १८ नोव्हेंबरपर्यंत नोंदणी करता येणार आहे.

वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी चीन व रशियामध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या अधिक असते. वैद्यकीय शिक्षण पूर्ण झाल्यावर हे विद्यार्थी पुन्हा भारतात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी येतात. मात्र यासाठी विद्यार्थ्यांना परदेशी वैद्यकीय पदवी परीक्षा देणे बंधनकारक असते. राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने ही परीक्षा १२ जानेवारी रोजी घेणार असल्याचे स्पष्ट केले होते. मात्र परीक्षेसाठीच्या नोंदणी प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले नव्हते. आयोगाने सोमवारी सकाळी नोंदणी प्रक्रियेचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार विद्यार्थ्यांना २८ ऑक्टोबरपासून १८ नोव्हेंबर रोजी रात्री ११.५५ मिनिटांपर्यंत अर्ज नोंदणी करता येणार आहे. त्यानंतर २१ ते २५ नोव्हेंबर रोजी विद्यार्थ्यांना शुल्क भरता येणार आहे. अर्ज भरताना विद्यार्थ्यांकडून स्वाक्षरी, अंगठ्याचा ठसा, छायाचित्र अपलोड करताना काही चूक झाली असल्यास ती ६ ते ९ डिसेंबरपर्यंत सुधारता येणार आहे. त्याचप्रमाणे कागदपत्रांमध्ये बदल करण्यासाठी २० डिसेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतरही प्राथमिक वैद्यकीय योग्यता प्रमाणपत्र, भारतीय दूतावासाकडून प्राथमिक वैद्यकीय योग्यता प्रमाणपत्राची सत्यता पडताळणी, पात्रता प्रमाणपत्र, भारतीय नागरिकत्वाचा पुरावा अशी कागदपत्रांमधील चूका सुधारण्यासाठी विद्यार्थ्यांना पुन्हा २७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून ३० डिसेंबरपर्यंत रात्री ११.५५ मिनिटांपर्यंत संधी देण्यात येणार आहे. यानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या कागदपत्रांमध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपुरात शक्तीप्रदर्शन करीत विविध उमेदवारांकडून उमेदवारी अर्ज दाखल

## ढोल-ताशा पारंपारिक वाद्य, भव्य रॅलीने वेधले लक्ष; कार्यकर्त्यांची अलोट गर्दी, महापुरुषांना अभिवादन करत अनेकांनी भरला उमेदवारी अर्ज







## भारतीय जनता पार्टीचे अधिकृत उमेदवार समाधान आवताडे यांनी अर्ज दाखल केला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पार्टी व महायुतीचे अधिकृत उमेदवार समाधान महादेव अवताडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यांच्या समवेत युट्युबियन शुगरचे उमेश परिचारक, काशिगाव ची ज्येष्ठ नेते देशमुख, यांच्या समितीने आपला उमेदवारी अर्ज भरला आहे.

भारतीय जनता पार्टी व महायुतीचे अधिकृत उमेदवार समाधान महादेव अव-ताडे पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी आपला उमेदवारी अर्ज आज २८/१०/२०२४ रोजी. इटूबियन शुगरचे चेअरमन उमेश परिचारक तसेच ज्येष्ठ नेते देशमुख यांच्या समित अर्ध भरला. विद्यमान आमदार समाधान आवताडे यांची सासरे बाळासाहेब श्रीहरी माडे यांचे निधन झाल्याने त्यांनी कोणतीही शक्ती प्रदर्शन न करता साध्या पद्धतीने रॅली ही न काढता उमेदवारी अर्ज भरला आहे.

आ. अवताडे यांच्या माध्यमातून मतदार संघातील अनेक विकास कामे मार्गी लागले आहे जनता पार्टी व माहितीचे त्यांना या मतदारसंघात दुसऱ्यांदा उमेदवारी जाहीर केली आहे. अवताडे यांनी प्रत्येक कार्यकर्त्याला आपापल्या गावात जाऊन त्या ठिकाणी आपल्या कमळ याचे नाव चे बटन दाबून अशा प्रकारचे प्रचार करून जास्तीत जास्त प्रचार करावा अशी आव्हान त्यांनी केले आहे.

## नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी महाराष्ट्र नवनिर्माण से-नेचे अधिकृत उमेदवार दिलीप धोत्रे यांनी सोमवारी प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांनी आज पूर्णा येथील श्री बिरोबा हुलजंती येथील श्री महालिंग चे दर्शन मंगळवेढा येथील संत दामाजीपंत पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन चोखामेळा यांची दर्शन घेऊन तसेच छत्रपती शिवाजी महाराज मासाहेब जिजाऊ, महात्मा फुले, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर अहिल्यादेवी, भाई राऊळ, यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून दर्शन घेऊन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

यानंतर त्यांनी आपला उमेदवार अर्ज श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या च नाव ठेवून दर्शन घेतले त्याचबरोबर त्यांनी सर्व महापुरुषांना पुष्पहार पण घालून अभिवादन करून नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये म्हणून त्यांनी शक्ती प्रदर्शन न करता आ-पला प्रमुख कार्यकर्त्यांच्या साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल केला.

## अनिल सावंत यांनी राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार गटातून अनिल सावंत यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यांच्या कडून अनिल सावंत यांनी सोमवारी प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुभाष भोसले, पंढरपूर राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संदीप मांडवे, अनिल सावंत यांनी पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन घेऊन चोखामेळाचे दर्शन घेऊन छत्रपती शिवाजी महाराज, मासाहेब जिजाऊ महात्मा फुले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, भाई राऊळ, हुतात्म्यांना अभिवादन करून यांचे दर्शन घेऊन आपला उमेदवारी अर्ज भरला आहे.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट यांच्या कडून अनिल सावंत यांनी सोमवारी प्रमुख कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला पंढरपूर मंगळवेढा विधानसभा संघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून उमेदवारी अनिल सावंत यांना आज पंढरपूर श्री विठ्ठल रुक्मिणी चोखामेळा ते दर्शन घेऊन तसेच छत्रपती शिवाजी महाराज मासाहेब जिजाऊ महात्मा ज्योतिबा फुले विश्वरत्न परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर बाही राहुल यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अर्पण करून दर्शन घेऊन उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

## थोडक्यात...

### आयटीआय कॉलेज समोर अपघात; माहिला जखमी

सोलापूर (प्रतिनिधी) आयटीआय कॉलेज समोर झालेल्या अपघातात एक जण जखमी झाल्याची घटना १८ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी पावणेसहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी कस्तुराबाई चिमाजी गाडेकर (रा.भीमा सोसायटी आरटीओ जवळ) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी या भाजी खरेदी करून पायी घराकडे जाण्यासाठी रस्ता क्रॉस करत असताना सैफुल दिशेने येणारी दुचाकी क्रमांक एमएच.१३.डीयू.४५०२ यावेळी दुचाकीस्वार याने त्याच्या ताब्यातील दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांना धडक देऊन दुखापत होण्यास कारणीभूत ठरला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार सोनार हे करीत आहे.

### लाकडी बांबूने एकाच बेदम मारहाण ; तिघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) लाकडी बांबूने फिर्यादी राजेश भालचंद्र काळे (वय-३६-,रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर १, पारधी कॅम्प) यांना त्यांच्या ओळखीचे कृष्णा शिंदे व अक्षय पवार यांनी डोक्यावर पाठीवर,कमरेवर व हातावर मारून जखमी केले.तसेच समाधान पवार याने राजेश काळे यांना खाली पाडून लाथा बुक्क्यांनी मारहाण करत दमदाटी केल्याची फिर्याद राजेश काळे यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली आहे.हि घटना २२ ऑक्टोंबर रोजी रात्री नऊ वाजण्याच्या दरम्यान फिर्यादी यांच्या घरामागे घडली.त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कृष्णा शिंदे,अक्षय पवार,समाधान पवार (सर्व.रा.परंडा रोड,कुरडवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस नाईक जाधव हे करीत आहेत.

### पप्पू दोन जिल्ह्यातून तडीपार

सोलापूर (प्रतिनिधी) सामान्य नागरिकांना दमदाटी करणे, शिवीगाळ करून मारहाण करणे,घातक हत्यारांसह गंभीर दुखापत करणे असे अनेक गुन्हे दाखल असलेला विकास उर्फ पप्पू सुरेश दोरकर (वय-४१,रा.गणेश नगर,जोशी गल्ली,बाळे) याला सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातून दोन वर्षांकरिता तडीपार करण्यात आले आहे. तडीपारचा प्रस्ताव पोलीस उपायुक्त परिमंडल यांना सादर केल्यानंतर त्या अनुषंगाने पोलीस उपायुक्त विजय कबाडे यांनी कार्यवाही करून तडीपार आदेश क्रमांक २७७८/२०२४ दि.२८ ऑक्टोंबर रोजी विकास उर्फ पप्पू दोरकर याला दोन वर्षांकरिता दोन जिल्ह्यातून तडीपार करून त्याला तडीपार केल्यानंतर पुणे येथे सोडण्यात आलेले आहे.

## दिवाळी अगोदर मिठाई वाटल्याने मूकबधिर मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले

# युवा क्रांती प्रतिष्ठान कडून दुर्लक्षितांची दिवाळी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे

इंदापूर.ता.२६: दिवाळीपूर्वी श्री समर्थ व्यायाम शाळा संचलित मूकबधिर आणि गतिमंद या शाळे-तील विद्यार्थ्यांना दिवाळी अगोदर चार-पाच दिवस सुट्ट्या लागतात. त्यामुळे या शाळेतील विशेष मुलांना दिव-ाळीचे खाऊवाटप करता येणार नाही त्यांची दिवाळी गोड होणार नाही त्यामुळे दिवाळी अगोदर आठ दिवस या शाळे-तील मूकबधिर मुलांची दिवाळी गोड व्हावी म्हणून त्यांना आठ दिवस अग-ोदरच युवा क्रांती प्रतिष्ठानच्या वतीने मिठाई देऊन त्यांची दिवाळी गोड करण्यात आली.

> मी नेहमी म्हणतो परमेश्वराने आपल्याला डोळे दिलेत, ऐकायला कान दिलेत आणि बोलायला शब्द दिलेत पण या लेकरांना कानाने ऐकता येत नाही. काहींना बोलता येत नाही. आणि आपण बोललेलं सहजा सहजी उमगत नाही. तरीही डोळ्यांच्या हावभावाने आणि हातवाऱ्याने ही निष्पाप बालके आमच्या मना-तील हावभाव समजून घेतात. दरवर्षी दिवाळी रंगपंचमी या सणांना ती आपली आतुरतेने वाट बघतात. त्यांच्याबरोबर दिवाळी साजरी करणार याची उत्सुकता त्यांना जास्त असते.या लेकरांनी दिले आशीर्वाद, प्रेम, प्रतिसाद आम्हाला स्वर्ग सुख देऊन जातो.
>
> **– प्रशांत उषा भानुदास शिताप (युवा क्रांती प्रतिष्ठान इंदापूर.)**







नेहमीच युवक क्रांती प्रतिष्ठानकडून इंदापूर शहरांमध्ये विविध सामाजिक उपक्रम घेत-ले जातात यामध्ये गरीब गरजूंना मदत तसेच गरीब मुलांना कपडे, खाऊंचे वाटप यासारखे अनेक सामाजिक उपक्रम राबविले जा-तात.दरवर्षी युवा क्रांती प्रतिष्ठानचा संकल्प असतो की या परमेश्वराच्या लेकरांना विशेष बालकांना पहिल्यांदा दिवाळी भेट द्यायची आणि नंतर युवा क्रांती प्रतिष्ठानचा उपक्रम सुरू करायचा. २०११ पासून दरवर्षी युवा क्रांती प्रतिष्ठान कडून ही दिवाळी अगोदरची दिवाळी खूपच गोड सुंदर आणि हृदयस्पर्शी असते.

युवा क्रांती प्रतिष्ठान करून लाभो राबवण्यात आलेल्या या अनोख्या सोहळ्यासाठी महादेव लोखंडे, बाळासाहेब लोंढे, सु-धीर मखरे, तुकाराम कांबळे, गणेश टुले, सायरा भाभी अत्तार, कल्पनाताई भोर, स्वाती अदटराव, असलम शेख, विरोचन सिताप, रोटरी क्लबचे अध्यक्ष मोरेश्वर कोकरे आणि युवा क्रांती प्रतिष्ठानचे सर्व सदस्य उपलब्ध उपस्थित होते

संस्थेचे शिक्षक शिवाजी शेळवणे यांनी उपस्थितांचे स्वागत करून आभार मानले. कृपया तुम्ही ही तुमच्या भागात सभोवताली ही गरीब गरजू निष्पाप लेकरं जी आनंदाच्या या सणाला पोरकी असतात अशा सोबत आपली दिवाळी साजरी करा असे आव-ाहन यावेळी युवा क्रांती प्रतिष्ठानचे प्रशांत शिताप यांनी केले.



## रिपाइं (आठवले) पक्षाच्या कार्यकर्त्यांना सन्मान पुर्वक सामावून न घेतल्यास वेगळा विचार करावा लागेल राहावे : नळदुर्ग येथे आयोजित रिपाइंच्या बैठकीत निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : महायुतीचा घटक पक्ष म्हणून रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या कार्यकर्त्यांना सन्मान पुर्वक प्रचार मोहीमेत सामावून न घेतल्यास आपणास वेगळा विचार करावा लागेल असा निर्णय नळदुर्ग ता.तुळजापूर येथे आयोजित रिपाइं (आठवले) पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठकीत घेण्यात आला. होऊ घातलेल्या महाराष्ट्र राज्याच्या विधानसभा निवडणुक संदर्भात नळदुर्ग येथे नळदुर्ग व परिसरातील रिपाइं (आठवले) कार्यकर्त्यांची एक महत्त्व-पूर्ण बैठक घेण्यात आली .या बैठकीत भाजपा, रिपाइं (आठवले) व मित्र पक्षाची महायुती असून महायूतीचा घटकपक्ष म्हणून तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून महायुती चे उमेदव-ारी म्हणून आमदार राणाजगजितसिंह पाटील हे निवडणूक लढवित आहेत. परंतू त्यांना मित्र पक्षाचा विसर पडलेला दिसून येतो आहे.आता पर्यंत रिपाइं च्या कार्यकर्त्यांना कोणत्याही बैठकीला किंवा कार्यक्रमास विश्वासात घेतले नाही.

## डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने टिकेकरवाडी येथे आरोग्य प्रकल्पाचे उद्घाटन

डॉ. विनायक टेंभुर्णीकर

# शरीराबरोबरच कौटुंबिक स्वास्थ्य जपणे महत्त्वाचे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी-.

मोबाईल आणि इंटरनेटच्या अधीन गेलेल्या आजच्या पिढीमुळे कुटुंबातील संवाद हरवत चालला आहे. मुलं आणि पालकांमध्ये दुरावा वाढत आहे. त्यामुळे शरी-राचे स्वास्थ्य जपण्याची आपण जेवढी काळजी घेतो तेवढेच कुटुंबाचे स्वास्थ्य जपणे गरजेचे आहे.

अन्यथा भयंकर मोठ्या परिणामांना सामोरे जावे ला-गेल असे प्रतिपादन निमाचे राष्ट्रीय अध्यक्ष व डॉ. हेडगेवार सेवा प्रकल्पाचे प्रमुख डॉ. विनायक




टेंभुर्णीकर यांनी केले

डॉ. हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने चालविण्यात येणाऱ्या तिसऱ्या आरोग्य प्रकल्पाचे उद्घाटन टिकेकर वाडी येथे करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ममता कुलकर्णी, रक्तपेढीचे संचालक मिलिंद फडके, प्रकाश कुलकर्णी एनटीपीसीचे नंदी, वालचंद समाजकार्य विभागाच्या प्रा. डॉ. विजया महाजन हे मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी महाजन यांनी समाज परिवर्तनामध्ये महिलांची भूमिका महत्त्वाची असून एक महिला आरोग्यपूर्ण राहिली तर ती कुटुंबाचा पर्यायाने समाजाचा विकास करू शकेल यासाठी या आरोग्य प्रकल्पाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.

यावेळी ममता कुलकर्णी यांनी या प्रकल्पामुळे गरीब, गरजू रुग्णांना सेवा मिळणार आहे. तसेच मोठ्या व दुर्धर आजाराचे निदान लवकर झाले तर त्यावर उपचार करणे सोयीचे होणार आहे. त्यासाठी हे आरोग्य केंद्र टिकेकर वाढीसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्रीमती हेमा टिकेकर आणि बचत गटाचे कार्य करणाऱ्या अन्नपूर्णा काळे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता कुलकर्णी यांनी केली प्रास्ताविक रंगनाथ जोशी यांनी तर आभार डॉ. उत्कर्ष वैद्य यांनी मानले.

कार्यक्रम कार्यक्रमास रा. स्व संघाचे जिल्हा सेवा प्रमुख श्री करपे, सिद्धाराम पोद्दार, डॉ. यशवंत गुंड, जनसंपर्क अधिकारी रवी कोटा उपस्थित होते. या वेळी एकूण ३० रुग्णांची तपासणी करण्यात आली.

## थोडक्यात...

### सर्वसाधारण निवडणूक निरीक्षक सुबोधकुमार यांचे अकलूज येथे आगमन

सोलापूर (जिमाका) : २५२-पंढरपूर, २५३-सांगोला व २५४-माळशिरस (अ.जा.) या तीन विधानसभा मतदारसंघासाठी श्री. सुबोधकुमार, भा.प्र.से. यांची सर्वसाधारण निरीक्षक म्हणून भारत निवडणूक आयोगाने नियुक्ती केली असून आज दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी त्यांचे आगमन २५४-माळशिरस (अ.जा.) मतदारसंघांतर्गत अकलूज येथे झाले आहे. निवडणूक कालावधीत मा.सर्वसाधारण निरीक्षक श्री. सुबोधकुमार, भा.प्र.से. यांचे वास्तव्य शासकीय विश्रामगृह, महर्षि चौक, अकलूज, ता.माळशिरस येथे असणार आहे. त्यांचा भ्रमणध्वनी क्र.८९९९२७९००९ हा असून नागरिकांना मा.निरीक्षक यांना दौऱ्याचे दिवस सोडून इतर दिवशी सकाळी ११ ते १२ या कालावधीत सभागृह, शासकीय विश्रामगृह, अकलूज, माळशिरस येथे संपर्क साधता येईल असे कळविण्यात आले आहे.

### महिलेचा मृत्यू ; अज्ञातावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) अक्कलकोट रोडवरील कार दुचाकीच्या अपघातात झालेल्या घटने प्रकरणी एका महिलेचा मृत्यू झाल्याची घटना २४ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी रमेश विजयकुमार कुंभारीकर (वय-३४,रा.जंगम वस्ती) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी व फिर्यादी यांचा मुलगा वरद व पत्नी लक्ष्मी असे तिघे मिळून दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीजे.३०२१ यावरून बांधकाम बघण्याकरिता गेले होते. त्यानंतर घराकडे जात असताना अक्कलकोट रोडवरील टेलिफोन टॉवर येथे आले असता कार क्रं.एमएच.१४.सीके.९२४७ यातील कारचालकाने निष्काळजीपणाने व अविचाराने अचानक उजव्या बाजूस वळण घेतल्याने फिर्यादी यांच्या दूचाकीला डाव्या बाजूस धक्का लागल्याने फिर्यादी यांची पत्नी लक्ष्मी रमेश कुंभारीकर (वय-३४) या रस्त्याच्या मधोमध खाली पडल्याने त्यांच्या डोक्यात जबर मार लागून कानातून व नाकातून रक्तस्त्राव होऊन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाला आहे.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास महिला पोलीस हवालदार वाघमोडे या करीत आहेत.

# अक्कलकोटमध्ये शक्तीप्रदर्शन करीत उमेदवारी अर्ज दाखल

## राष्ट्रीय समाज पक्षाकडून सुनील बंडगर यांचा उमेदवारी अर्ज दाखल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रीय समाज पक्षाकडून श्री सुनिल शिवाजी बंडगर यांनी सोमवारी मोठ्या गाजावाजाने धनगरी ढोल तसेच हालगीवाद्यासह रॅली काढुन आपला उमेदवारी अर्ज दाखल केला.

फत्तेसिंह चौकापासून रॅलीला सुरुवात झाली पुढे कमलाराजे चौक,एवन चौक,नवीन राजवाडा, बसस्थानक, विजय कामगार चौक, कारंजा चौक, तुप चौक, फत्तेसिंह चौक येथे समाप्त करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय समाज पक्षाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्तात्रय माडकर, युवक आघाडीचे तालुका अध्यक्ष दाजी कोळेकर, संतोष शिंदे, निलेश लवटे, गुणवंत लवटे, महादेव पुजारी, पुंडलिक पुजारी, विष्णू ठेंगले, किरण माने, विठोबा कोळेकर, रेवणसिध्द शेरी, भुताळी पुजारी, काशिनाथ घोडके, औदुंबर बंडगर, रवी सलगरे, बिरप्पा मैंदर्गी, सोमनाथ घोडके, सद्दाम तासेवाले, समीर कोरबू, शिवनिंगप्पा गायकवाड, भिमाशंकर बंदिछोडे, शिवयोगी पुजारी यांच्या सह आदी उपस्थित होते.

## वंचित बहुजन आघाडीकडून संतोषकुमार इंगळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/तालुका प्रतिनिधी : २५०, अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोष कुमार खंडू इंगळे यांनी सोमवार दि. २८ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल केला. तहसिल कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी बनसोडे यांच्याकडे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोषकुमार इंगळे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.



प्रारंभी अक्कलकोट शहरातील भीम नगर येथून भव्य अशी वाजत गाजत रॅली काढण्यात आली. अक्कलकोट शहरातील राजे फत्तेसिंह चौक , मेन रोड कारंजा चौक , विजय कामगार चौक ते बस स्थानक मार्गे रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते या रॅलीचा समारोप बस स्थानकासमोरील श्री मल्लिकार्जुन देवस्थान परिसरातील वंचित बहुजन आघाडीच्या प्रचार कार्यालयाजवळ करण्यात आला. या रॅलीमध्ये चंद्रशेखर मडीखांबे ,ज्योतिर्लिंग स्वामी शीलामणी बनसोडे , रविराज पोटे , सिद्धार्थ बनसोडे विशाल ठोंबरे ,संदीप बाळशंकर , गौतम गायकवाड , नागेश हरवळकर , माणिक गायकवाड , बबन गायकवाड , यशवंत इंगळे , राजू इंगळे ,राजू वाघमारे कृष्णा इंगळे गोविंद इंगळे सुभाष इंगळे , गंगाराम वाघमारे , संतोष बाळशंकर ,अमृत सोनकांबळे , हनुमंत जाधव , सतीश बनसोडे , महादेव थोरे ,शेखर सोनकांबळे , तुकाराम साखरे ,प्रकाश शिंदे ,खाजाप्पा आयवळे , शिवाजी चौगुले , संजय इंगळे , विजय भालेराव , गंगाराम गायकवाड , श्याम बनसोडे ,शंकर शिंदे ,बाबुराव गायकवाड , चंदू शिंगे ,संजय शिंदे , अजय गंगावणे आदींसह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी , कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटाकडून अभिजीत पाटील भरणार उमेदवारी अर्ज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : माढा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरचंदरी पवार गटाचे. ओम महा विकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून उद्या दिनांक २९ सप्टेंबर रोजी सकाळी दहा वाजता अर्ज भरणार आहेत.



माढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार म्हणून अभीदबा पाटील यांच्या उमेदवारी अर्ज भरण्यासाठी महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार गटाचे नेते उत्तमराव जानकर तसेच माजी आमदार नारायण आबा पाटील यांच्या उपस्थितीमध्ये दिनांक २९ सप्टेंबर रोजी. अर्ज अर्ज भरण्यासाठी माढा मतदारसंघातील मतदारांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान करण्यात आले आहे.

## जोरदार शक्तीप्रदर्शन करत वंचित बहुजन आघाडीचे संतोष पवार यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : २५१-सोलापूर दक्षिण विधानसभा मतदारसंघातुन वंचित बहुजन आघाडीचे अधिकृत उमेदवार संतोष पवार यांनी वंचित बहुजन आघाडी पक्षाचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते व मार्ग फाऊंडेशनच्या पदाधिकारी व सदस्यांसमवेत जोरदार शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. मार्ग फाऊंडेशनच्या 'व्हाईट हाऊस' मुख्य कार्यालयापासून रॅलीला सुरुवात झाली. डोक्यावर पक्षाच्या टोप्या,हातात झेंडा घेऊन पवार यांच्या समर्थनार्थ घोषणा देऊन कार्यकर्त्यांनी परिसर दणाणून सोडला.या रॅलीमध्ये हजारो समर्थकांनी उपस्थिती देऊन संतोष पवार यांना पाठिंबा दिला.

संतोष पवार यांनी त्यांच्या मतदारसंघातील विविध प्रश्नांवर भर देऊन या निवडणुकीत परिवर्तन घडवून जनतेच्या पाठिंब्याबरोबरच समाजकार्यातील प्रदीर्घ अनुभवाचा वापर करून प्रस्थापित नेते मंडळींना व त्यांच्या घराणेशाहीला शह देऊन दक्षिण सोलापूरमध्ये प्रगतीचा नवा अध्याय लिहिण्यासाठी ज्यायोगे . जनतेच्या कल्याणासाठी वंचितांच्या हक्कांसाठी,शैक्षणिक,सामाजिक, आणि औद्योगिक क्षेत्रांमध्ये विकास काम करून दक्षिण सोलापूरसाठी एक आदर्श विकासाचा मार्ग निर्माण करण्यासाठी हि निवडणूक जिंकणारचं असा विश्वास पवार यांनी व्यक्त केला. वंचित बहुजन आघाडी पक्षाचे कार्यकर्ते मार्ग फाऊंडेशन



आणि त्यांच्या समर्थकांनी एकजुटीने केलेल्या या शक्ती प्रदर्शनामुळे पवार यांच्या उमेदवारीला व्यापक जनाधार मिळणार असल्याची चित्र दिसत आहेत. यावेळी मार्ग फाऊंडेशन आणि वंचित बहुजन आघाडी चे समस्त पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

## निवडणूक खर्चासाठी उमेदवाराचे स्वतंत्र बँक खाते आवश्यक : डॉ. सचिन ओम्बासे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

धाराशिव: सुधाकर रणदिवे : भारत निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार निवडणूक खर्चावर लक्ष ठेवण्यासाठी प्रत्येक उमेदवारांचे निवडणूक खर्चासाठी स्वातंत्र्य बँक खाते उघडणे आवश्यक आहे उमेदवाराला हे बँक खाते त्यांच्या नावे किंवा त्यांच्या निवडणूक प्रतिनिधी यांच्या संयुक्त नावाने उघडता येते. सहकारी बँक तसेच कोणत्याही बँकेत किंवा पोस्ट ऑफिस मध्येही खाते उघडता येते. उमेदवाराने निवडणूक खर्चासाठी असलेली संपूर्ण रक्कम संबंधित बँक खात्यामध्ये जमा करणे आवश्यक आहे निवडणुकीसाठी उघडलेल्या बँक खात्यातून उमेदवाराने आपला निवडणूक खर्च धनादेश/ धनाकर्ष/ आरटीजीएस/एन ई



एफ टी द्वारे करणे आवश्यक आहे. उमेदवारांना बँक खाते उघडल्यास तत्पर सेवा मिळावी व निवडणूक काळात संबंधित खात्यातून प्राधान्याने पैसे काढण्यास आणि पैसे जमा करण्याच्या उद्देशाने समर्थित काउंटर (ऊशवळलरींशव उेीपींशी) उघडणे बाबत सर्व बँकांना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी निर्देश दिले आहेत.




## राष्ट्रवादी काँग्रेस च्या शहर उपाध्यक्षपदी रिझवान शेख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दर्शनाळ/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या शहर उपाध्यक्षपदी रिझवान शेख पत्रकार यांची नियुक्ती करण्यात आली . जुळे सोलापुरातील हॉटेल ताराई येथे आयोजित बैठकीत शहर अध्यक्ष सुधीर खरटमल यांच्या हस्ते या निवडीचे पत्र देण्यात आले.

रिझवान शेख हे जनक्रांती पत्रकार संघ चे जिल्हा अध्यक्ष व बशीरुज्जम सामाजिक संस्थे चे संस्थापक अध्यक्ष व तसेच साप्ताहिक मित्रप्रेम चे कार्यकारी संपादक आहे . त्यांच्या वडीला पासून ते शरद पवार चे कट्टर समर्थक आहे .

या वेळी पक्षाचे निरिक्षक शेखर मानेसाहेब , कार्याध्यक्ष नानासाहेब काळे, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद दादा गायकवाड ,जिल्हा अध्यक्ष भारत जाधव ,माजी महापौर मनोहर सपाटे ,नलिनी चंदेले,महिला अध्यक्ष सुनीता रोटे ,युवक अध्यक्ष अक्षय वाकसे , कार्याध्यक्ष सर्फराज शेख , प्रदेश उपाध्यक्ष प्रशांत बाबर . मोनिका पवार, माजी नगरसेवक पीर अहमद शेख , अल्पसंख्याक प्रदेश उपाध्यक्ष जावेद खैरदी,इत्यादी नेते माजी नगरसेवक उपस्तिथ होते .

## ३ नोव्हेंबर रोजी सोलापुरात अल्पसंख्यांक शिक्षण परिषद व एशिअन मायनॉरिटी युनिव्हर्सिटीचा पायाभरणी सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : ग्लोबल एज्युकेशनल अँड हेल्थ ऑर्गनायझेशनच्यावतीने सोलापूर शहराजवळ दक्षिण सोलापूर तालुक्यात वळसंगजवळ मायनॉरिटी युनिव्हर्सिटीची उभारणी करण्यात येणार आहे. या विद्यापीठाचा पायाभरणी सोहळा तीन नोव्हेंबरला आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने अल्पसंख्यांक समाजातील शैक्षणिक समस्यांचा उहापोह करण्यासाठी राष्ट्रीय शिक्षण समन्वय परिषद घेण्यात येणार असल्याची माहिती या विद्यापीठाचे मुख्य प्रवर्तक आसिफ इकबाल यांनी पत्रकार परिषदेत दिली.



### वळसंगजवळ मायनॉरिटी युनिव्हर्सिटीची उभारणी

मागील अनेक वर्षांपासून अल्पसंख्यांक समाजातील शिक्षणाची स्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. बालमजूर, शाळाबाह्य मुलांची संख्या वाढत चालली आहे. सुविधा नसल्याने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. या सर्व समस्यांना पार्श्वभूमीवर अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक विकासाचे उद्देश नजरेसमोर ठेऊन एशियन मायनॉरिटी विद्यापीठाची स्थापना करण्यात येत आहे. या विद्यापीठाची दिशा व त्याची गरज स्पष्ट करण्यासाठी सोलापूर शहरात तीन नोव्हेंबरला दिवसभर 'अल्पसंख्यांक शैक्षणिक समन्वय परिषद' घेण्यात येत आहे. या परिषदेसाठी उद्घाटक म्हणून यावेळी डॉ. जहीर काझी, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे उमरैन महफूज रहमानी, माझी कुलपती जफर सरेश वाला, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु एस. एन. पठाण, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु एन. एन. मालदार, अजमेर दर्गाह ट्रस्टचे चेअरमन सय्यद सरवर चिश्ती, समीर सिद्दीकी, मुबारक कापडी, डॉ. ऐनुल हसन, डॉ. अफसर आलम, मुहम्मद अतिक अहमद, डॉ. अब्दुल कदीर, हसन चौगले, अमीर अली खान, प्रो डॉ. गज़नफ़र अली, अली एम शम्सी, शाह आलम रसूल, एस. एन पठान , मुश्ताक अंतुले, इक्बाल मेमन, मुहम्मद अली पाटनकर, मेहबूब कासार, डॉ. शहीद खोत, आमिर इद्रिसि, इक्बाल शेख, अमीर अंसारी, डॉ. अंजुम कादरी, मुफ़्ती ज़ैनुलआबेदीन, खालिद सैफउद्दीन उपस्थित राहणार आहेत.

विद्यापीठाचा पायाभरणी समारंभ सकाळी आठ वाजता वळसंग येथे होईल. त्यानंतर सोलापूरातील हेरिटेज लॉन येथे १० वाजता परिषेदेस सुरुवात होईल. परिषद तीन सत्रात होणार आहे. आधुनिक शिक्षण गरज व आपली जबाबदारी हे पहिले सत्र सकाळी ११ वाजता सुरु होईल. या सत्रात अलीगड विद्यापीठाचे प्रा. सऊद आलम कास्मी, मेहमूद सिद्दीकी, खालीद सैफुद्दीन मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर दुपारी २.३० वा. मुस्लिम शिक्षण संस्था - समस्या व उपाय या विषयावर परिसंवाद होईल. या सत्रात शाह आलम रसुल,खालीद सैफुद्दीन, हे मार्गदर्शन करतील.

संध्याकाळी सहा वाजता जनसभा होईल. मौलाना आझाद विद्यापीठ जोधपूरचे संस्थापक अतिक अहमद हे या जनसभेचे अध्यक्ष असतील. शिक्षणतज्ज्ञ मुबारक कापडी, समीर सिद्दीकी यांची खुली जनसभा होईल.

या परिषदेसाठी सोलापूर शहरातील नागरीकांनी आणि शिक्षणक्षेत्रात कार्यरत शिक्षक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे असे आवाहन प्रस्तावित विद्यापीठाचे मुख्य प्रवर्तक आसिफ इक्बाल, फारुक सय्यद, डॉ.कासिम इमाम, सरफराज अहमद, ग्लोबल एज्युकेशनल अन्ड हेल्थ आर्गनाइजेशन, एशियन सेंटर फॉर सोशल स्टडीज व मासिक गुलबुटे मुंबई च्यावतीने करण्यात आले आहे.

**कळंब पोलीसांची धमाकेदार कामगिरी** — **१ लाख २२ हजार रुपये किंमतीचा गांजा जप्त**

# गांज्याची अवैध विक्रीसाठी लागवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे

२७/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे कळंब चे पोलीस निरीक्षक श्री. रवी सानप व त्यांचे पथकास गोपनीय बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, डोळा पिंपळगाव शिवारातील शेत गट नं १०५ येथे एका इसमाने त्याच्या शेतात गांजा सदृश्य झाडांची लागवड करुन जोपासणा करीत आहे. त्यावर पथकाने नमुद ठिकाणी जावून छापा टाकाला असता इसम नामे-अमर अंकुश टेकाळे, वय ३२ वर्षे रा. डोळा पिंपळगाव ता. कळंब जि. धाराशिव हा त्याचे वडीलाचे शेतात गांज्या या अंमली वनस्पतीची अवैध विक्री करण्याचे उद्देशाने झाडे





लावून त्यांची जोपासणा करीत असताना पथकास मिळून आला. यावर पथकाने सदर ठिकाना हून ६.१०८ किलो ग्रॅम वजनाचा एकुण १,२२,१६० रु किंमतीचा गांजा जप्त करुन अमर टेकाळे यांचे विरुध्द गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ कलम ८ (क), २० (क) अन्वये कळंब पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

सदर कामगिरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. संजय जाधव,अपर पोलीस अधीक्षक श्री. गौहर हसन व कळंब उपविभागीय पोलिस अधिकारी श्री संजय पवार यांचे मार्गदर्शनाखाली कळंब पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. रवी सानप, मसपोनि श्री. पुंडगे, सपोनि श्री. मगर पोलीस पो. उप निरीक्षक शिंदे ठाणे कळंब येथील अंमलदार शिवाजी राऊत, मनोज दळवी,अजिज शेख, अमोल माळी, किरण माळी, फुलचंद मुंडे, आसाराम खाडे, साईनाथ आशमोड,मपो कॉ संजीवनी वडकर, चालक इरफान शेख यांचे पथकाने केली.